मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | गुरुवार, दि. 28 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# संजीवन समाधी सोहळ्यासाठी आळंदीत बंदोबस्त!

## पिंपरी-चिंचवड पोलिसांची सतर्कता : पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केली पाहणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

दि.२६ ते २८ नोव्हेंबर या दरम्यान साजरे होणारे ७२८ संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज, संजीवन समाधी सोहळा व कार्तिकी यात्रा उत्सव अनुषंगाने आज (दि.२६) रोजी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी भेट देऊन बंदोबस्ताची पाहणी केली.



सदर भेटी दरम्यान कार्तिकीवारी निमित्त लावण्यात आलेल्या बंदोबस्ताची पाहाणी करुन अधिकारी व अमंलदार यांना आवश्यक सूचना दिल्या. तसेच माऊली मंदिर व्यवस्थापनाचे विश्वस्त मंडळाशी चर्चा केली. वाहतुक व्यवस्था, पार्किंग, गर्दीचे नियोजन, मनुष्यबळाचा योग्य वापर तसेच गुन्हेगारी नियंत्रणा करीता आवश्यक उपाययोजना, बंदोदस्ता बाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, बापु बांगर, पोलीस उप आयुक्त, (वाहतूक शाखा), राजेंद्रसिंग गौर, सहा. आयुक्त (चाकण विभाग), बाळासाहेब कोपनर, (गुन्हे-२), भिमा नरके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आळंदी पोलीस स्टेशन, बापु ढेरे, तसेच राजेंद्र उमाप, श्री. क्षेत्र ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त, योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, विश्वस्त, भावार्थ देखणे विश्वस्त, पोलीस अधिकारी व अमंलदार उपस्थित होते.



# महापालिका निवडणुकांचे बिगुल लवकरच!

## पिंपरी-चिंचवडमधील महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना विश्वास : महापालिका बरखास्त होऊन पावणेतीन वर्षे झाली

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका बरखास्त होऊन पावणेतीन वर्षे झाली आहेत. लोकसभेपाठोपाठ विधानसभा निवडणुका पार पडल्याने आता पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुका होतील, अशी शक्यता निर्माण झाली आहे. लवकरच महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजेल, असा विश्वास महायुतीच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.फेब्रुवारी 2017 ला महापालिकेची निवडणूक झाली.



भाजपने प्रथमच महापालिकेत सत्ता स्थापन केली. या पंचवार्षिकेचा कार्यकाळ 12 मार्च 2022 ला संपला. त्या दिवसांपासून महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू आहे. आयुक्त प्रशासक म्हणून कामकाज पाहत आहेत. कोरोना महामारी, ओबीसी आरक्षण, प्रभाग सदस्यसंख्या आदी विविध कारणांमुळे तसेच, न्यायालयीन प्रक्रियेमुळे या निवडणुका रखडल्या आहेत. परिणामी, कामे होत नसल्याची ओरड कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. पिंपरी-चिंचवडसह राज्यभरातील बहुतांश महापालिकेच्या निवडणुका होत नसल्याने कार्यकर्ते नाराज आहेत. रखडलेल्या निवडणुका तातडीने घेण्याबाबत कार्यकर्त्यांकडून दबाव वाढला आहे.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर महापालिकेची निवडणूक घेतली जाईल, असे सांगत वरिष्ठांनी दोन्ही निवडणुकीत माजी नगरसेवक, इच्छुक तसेच, कार्यकर्त्यांकडून पक्षाचा प्रचार करून घेतला. महापालिका निवडणुकीत उमेदवारी मिळेल, या आशेवर कार्यकर्ते व इच्छुकांनी जीव तोडून पक्षाच्या उमेदवारांचे काम केले. लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाले. राज्यात महायुतीचे सरकार आल्याने महापालिका निवडणुका तातडीने लागतील, अशा विश्वास महायुतीच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.

फेब्रुवारी 2017 मध्ये चारसदस्यीय प्रभागरचनेनुसार निवडणुका घेण्यात आल्या होता. त्या प्रभागरचनेनुसार निवडणुका घेण्यास महायुतीचे नियोजन आहे. त्यामुळे नव्याने प्रभागरचना करावी लागणार नाही; मात्र पुणे महापालिकेत काही नव्या भागांचा समावेश झाल्याने नव्याने प्रभागरचना करावी लागणार आहे. सदस्यसंख्येवरून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. विधानसभेला मोठा विजय मिळाल्याने राज्यभरात महायुतीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या लाभ उठविण्यासाठी राज्य सरकार महापालिका निवडणुका घेण्यासाठी सकारात्मक आहे, असे भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. न्यायालयाचा निकाल लागल्यांनतर लवकरच निवडणुका होतील, असा दावा केला जात आहे.

### महापालिकाही जिंकणार

**» विधानसभा निवडणुकीत भाजपसह महायुतीने प्रचंड विजय मिळविला आहे. मावळ लोकसभेला तसेच, चिंचवड, भोसरी व पिंपरीत महायुतीने घसघशीत यश प्राप्त केले आहे. लवकरच महापालिका निवडणुका होतील. त्या निवडणुकीतही भाजपा आणि महायुती मोठे यश मिळवून पुन्हा सत्ता गाजविले, असा विश्वास भाजपाचे माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांनी व्यक्त केला आहे.**

### मार्चपूर्वी महापालिका निवडणुका होतील

**» महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आले आहे. संपूर्ण राज्यात महायुतीसाठी उत्तम वातावरण आहे. त्यामुळे महापालिका निवडणूक मार्च 2025 अगोदर घेतल्या जातील. त्याबाबत यापूर्वीच अजित पवार यांनी तसे संकेत दिले आहेत, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी सांगितले.**

# पीएमआरडीए हद्दीत वाढली अनधिकृत बांधकामे

## पुढील आठवड्यापासून कारवाईला सुरुवात : पीएमआरडीएने पाठवली दहा हजारांहून अधिक बांधकामांना नोटीस

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत अनधिकृत बांधकामे वाढली आहेत. या बांधकामांवर नियंत्रण ठेवणे पीएमआरडीए प्रशासनाला जड जात आहे. 6 अनधिकृत बांधकामांबाबत दाखल केलेल्या गुन्ह्यांव्यतिरिक्त गेल्या दोन महिन्यांमध्ये अनधिकृत बांधकामांबाबत अन्य कारवाईच झालेली नाही.




रस्ते, पदपथ, जलवाहिन्या, लोहमार्ग यांना अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे वगळता अन्य बांधकामांवर कारवाई करण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली होती. त्याचप्रमाणे, राज्यामध्ये विधानसभा निवडणुकांची धामधुम सुरु होती. त्यामुळे अनधिकृत बांधकामावरील कारवाई थंडावली होती.

उत्तर प्रदेश येथे 2019 मध्ये बुलडोझरच्या साहाय्याने काही घरे पाडण्यात आली होती. त्यातील एका बाधिताने या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांच्या या याचिकेवर 17 सप्टेंबरला सुनावणी झाली. यासंदर्भात लवकरच मार्गदर्शक तत्त्वे घोषित करणार आहे. तोपर्यंत कारवाई करु नका, असे न्यायालयाने त्या प्रसंगी आदेशाद्वारे स्पष्ट केले.

मात्र, ज्यांनी सार्वजनिक रस्ते, रेल्वे रुळ, तलाव आणि इतर सरकारी मालमत्ता यांच्यावर अतिक्रमण केले असेल तर त्यांना नियम लागू राहणार नाही.ती मोकळी करता येतील, असेही न्यायालयाने म्हटले होते. या निकालाचा संदर्भ घेऊन पीएमआरडीएकडून अनधिकृत बांधकामांवरील कारवाई थांबविली होती. दरम्यान, अनधिकृत बांधकामांवरील कारवाईचा स्थगिती आदेश 13 नोव्हेंबरला मागे घेण्यात आला आहे.

### विधानसभा निवडणुकीचेही कारण

**» राज्यामध्ये 15 ऑक्टोबरपासून विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता सुरु झाली. 20 नोव्हेंबरला मतदान तर, 23 नोव्हेंबरला मतमोजणी झाली. म्हणजे जवळपास निवडणुकांमध्ये सव्वा महिन्यांचा कालावधी गेला. निवडणुकांसाठी पीएमआरडीएचे अधिकारी नियुक्त करण्यात आलेले होते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती आदेश मागे घेतल्यानंतरही पीएमआरडीएकडून अनधिकृत बांधकामांवर कारवाई होऊ शकलेली नाही.**

# महापालिका कार्यालयात शुकशुकाट

## निवडणुकीच्या कामावर नियुक्तीवर असलेले अधिकारी, कर्मचारी अद्यापही कामावर रूजू नाहीत




**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या कामावर नियुक्तीवर असलेले पिंपरी-चिंचवड महापालिकेचे बहुतांश अधिकारी व कर्मचारी याकाळात व्यस्त होते. निवडणूक संपून आता आचारसंहिताही संपली आहे. मात्र महापालिकेचे हे अधिकारी, कर्मचारी अद्यापही कामावर रूजू झालेले नाहीत. त्यामुळे महापालिका भवन तसेच, क्षेत्रीय कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या तुरळक असल्याने शुकशुकाट दिसून येत आहे. गेल्या दीड महिन्यापासून अशी परिस्थिती आहे.

महापालिकेचे तब्बल चार हजार अधिकारी आणि कर्मचारी हे पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक कामासाठी नेमण्यात आले होते. त्यांना निवडणुकीच्या विविध विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

निवडणुकीसाठी महापालिकेच्या तब्बल 3 हजार 962 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी काम केले. त्यामध्ये वर्ग दोन व तीनचे दोन हजार 352 अधिकारी व कर्मचारी आहेत. वर्ग चारचे एक हजार 610 कर्मचारी होते. पीआरओ, एफपीओ, ओपीओ, बीएलओ, झेडओ, एमओ विभागात एकूण एक हजार 215 कर्मचारी तैनात होते.

चिंचवड मतदारसंघासाठी एक हजार 140 अधिकारी व कर्मचारी, पिंपरी मतदारसंघासाठी एक हजार 419 अधिकारी व कर्मचारी आणि भोसरी मतदारसंघासाठी एक हजार 8 कर्मचाऱ्यांनी काम केले. अधिकारी व कर्मचारी इलेक्शन ड्युटीवर असल्याने, महापालिका व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये ते येत नसल्याने नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांची कामे रखडली आहेत.

फोन केल्यानंतर इलेक्शन ड्युटीवर असल्याची उत्तरे दिली जात होती. आचारसंहिता 15 ऑक्टोबरपासून लागू झाली होती. मतमोजणीनंतर निकाल शनिवारी (दि.23) जाहीर झाला आहे. आचारसंहिता उठली आहे. त्यामुळे निवडणूक कामकाजातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुन्हा कामावर रूजू होणे अपेक्षित होते. त्यामुळे सुमारे दीड महिन्यांपासून कामे तुंबून राहिली आहेत. निवडणूक संपूनही अधिकारी व कर्मचारी भेटत नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

### पुढील महिन्यापासून कामकाज सुरळीत होण्याची शक्यता

» विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी(दि.23) लागला. त्यानंतर सोमवार(दि.25) पासून अधिकारी व कर्मचारी महापालिका व क्षेत्रीय कार्यालयात रूजू होऊन दैनंदिन कामकाज सुरळीतपणे सुरू होईल, असे अपेक्षित होते. मात्र, अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुक्रवार(दि.29) पर्यंत रजा घेतल्या आहेत. त्यामुळे पुढील सोमवार(2 डिसेंबर) पासून सर्व अधिकारी व कर्मचारी कामावर हजर होऊन महापालिकेचे कामकाज नव्या दमाने सुरू करतील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# शहरात दर वर्षी तीन हजार झाडांवर कुऱ्हाड?

## उद्यान विभागाकडून खासगी जागेतील एक झाड तोडण्यासाठी केवळ दहा हजार रुपये शुल्क



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेकडून दर वर्षी किमान एक लाख वृक्षारोपण केले जात असले, तरी दर वर्षी महापालिकेकडूनच सुमारे तीन हजारांपेक्षा अधिक झाडे तोडण्यास परवानगी देण्यात येते. शिवाय विनापरवाना झाडांवर कुऱ्हाड घालण्यात येत असल्याने शहरातील झाडांची संख्या घटत असल्याचे निदर्शनास आले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात उद्यान विभागाच्या वतीने वृक्षारोपण केले जाते. मात्र, वृक्ष तोडण्याचे प्रमाण कमी होत नसल्याचे दिसत आहे. वृक्षारोपण केलेल्या रोपांची योग्य काळजी घेत नसल्याने अनेक रोपे जळून जात आहेत. विकासकामाच्या नावाखाली शहरातील झाडांवर मोठ्या प्रमाणावर कुऱ्हाड चालविण्यात येत आहे. रस्त्याचे रुंदीकरण, पदपथावरील खोदकाम, भूमिगत सेवावाहिन्या, बांधकामे आणि इतर विकासकामांसाठी झाडे तोडली जात आहेत. तर, झाडांच्या फांद्यांमुळे जाहिरात फलक दिसत नसल्याने, दुकान किंवा कार्यालयास अडथळा, पानांचा कचरा होत असल्याने झाडे तोडली जातात. मेट्रोच्या कामास अडथळा होत असल्यानेही पिंपरी ते निगडी मार्गावरील झाडे तोडली आहेत. विनापरवाना झाडे तोडण्याच्या प्रमाणतही वाढ झाली आहे.

**एक झाड तोडण्यासाठी दहा हजार रुपये**

उद्यान विभागाकडून खासगी जागेतील एक झाड तोडण्यासाठी केवळ दहा हजार रुपये शुल्क आकारले जाते. त्यामुळे शहरात बेसुमार वृक्षतोड होत आहे. अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यास महापालिकेच्या उद्यान विभागाला अपयश आल्याचे दिसून येत आहे.

### एक लाख 60 हजार वृक्षारोपण

» उद्यान विभागाच्या वतीने या वर्षी दोन लाख वृक्षारोपणाचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत एक लाख ६० हजार रोपांची लागवड करण्यात आली आहे. देहूरोड कटक मंडळ, दिघी व औंधच्या संरक्षण विभागाच्या हद्दीत लागवड करण्यात आली आहे. आणखी ४० हजार रोपे मोकळी जागा, रस्त्यांच्या कडेला लावण्यात येणार आहेत. बांबूची २५ हजार २६० झाडे लावण्यात आली आहेत.

“ उद्यान विभाग वृक्षतोड विभाग बनला आहे. विकासाच्या नावाखाली वृक्षतोड केली जाते. झाडे तोडण्यापेक्षा पुनर्रोपण केले पाहिजे, पर्यावरणप्रेमी प्रशांत राऊळ म्हणाले. उद्यान विभागाने लावलेली सर्व झाडे जगविण्याचा प्रयत्न केला जातो. रस्ता रुंदीकरण, खोदकाम व इतर कारणांमुळे काही झाडे तोडली जातात. परवानगी न घेता झाडे तोडल्यानंतर तक्रारींची तातडीने दखल घेऊन गुन्हा दाखल करण्यात येतो.

- उमेश ढाकणे, सहायक आयुक्त, उद्यान विभाग.

# शासन आदेशाला खासगी शाळांकडून ठेंगा

## सूचनेनंतरही पूर्व प्राथमिक व प्राथमिकचे वर्ग सकाळी नऊपूर्वीच : शिक्षण विभागाचे कोणी ऐकेना

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सर्व खासगी शाळांची वेळ सकाळी नऊ किंवा नऊ नंतर घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर शहरातील पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतच्या खासगी शाळांचे वर्ग सकाळी नऊ वाजल्यानंतर भरवले जावेत म्हणून महापालिका शिक्षण विभागाकडून सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्र काढण्यात आले. परंतु, १५ जूनपासून शाळांची घंटा वाजली. पण, सर्व खासगी शाळा सकाळी ७ वाजताच सुरू झाल्या आहेत. त्यामुळे खासगी शाळांनी शासन आदेश धुडकावला आहे. त्या खासगी शाळांवर कारवाई होणार का, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.



### शाळांना कारवाईचा इशारा

» महापालिका शिक्षण विभागाकडून सन २०२४-२०२५ पासून पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथी पर्यंतचे वर्ग भरविण्याची वेळ सकाळी ९ किंवा ९ नंतर ठेवण्याचे सूचित केले आहे. दरम्यान, काही शाळांनी इयत्ती चौथीपर्यंतचे वर्ग ९ किंवा ९ नंतर भरणे शक्य होत नाही, अशा प्रकारे शिक्षण विभागाकडे कळविले आहे. त्यानुसार ज्या शाळांनी दोन सत्रामध्ये शाळा भरवण्यासाठी कार्यालयाची परवानगी घेतलेली आहे. त्यांनी इयत्ता ५ वी किंवा इयत्ता ६ वी पासूनचे वर्ग सकाळच्या सत्रात व पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग दुपारच्या सत्रात भरावे. या अध्यापनाचा निश्चित केलेला कालावधी कमी होणार नाही, याची दक्षता संबंधित शाळा व्यवस्थापनाने घ्यावी. शासन आदेशाचे पालन न करणा-या शाळांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील ८० टक्के शाळा सकाळच्या सत्रात भरवल्या जातात. अनेक भागात लहान मुलांच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळादेखील सकाळी सातच्या आसपास भरतात. त्यामुळे मुलांचे डब्बे बनवण्यासाठी पालकांना पहाटे लवकर उठून धावपळ करावी लागते. तसेच मुलांना पहाटे सहा वाजल्यापासून उठून दप्तराची आवराआवर करावी लागते. या धावपळीत मुलांची झोप पूर्ण होत नाहीच. शिवाय पालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

शहरात महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळादेखील सकाळच्या सत्रात भरतात, तर खासगी मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम आणि सीबीएसई शाळादेखील सकाळच्या ७ ते ८ च्या सुमारास सकाळच्या सत्रात भरत आहेत. महापालिकेसह खासगी शाळांना अनेकदा अपुऱ्या इमारतीमुळे दोन टप्प्यात ह्या शाळा भरवाव्या लागत आहेत. यात पूर्व प्राथमिक, प्राथमिक वर्ग हे सकाळच्या सत्रात भरवण्यात येत आहेत. त्यानंतर दुपारच्या सत्रात माध्यमिक वर्ग भरवले जात आहेत.

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने जारी केलेल्या अध्यादेशानुसार सकाळी ९ पूर्वी भरणाऱ्या राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरविण्याच्या वेळात बदल करणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक परिस्थितीचा विचार करून सकाळी ९ किंवा ९ नंतर सर्व माध्यमांच्या पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग करण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार शहरातील सर्व माध्यमांच्या खासगी शाळा पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरण्याची वेळ सकाळी ९ च्या अगोदरची आहे, त्या शाळांनी पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरवण्याबाबतची वेळ सकाळी ९ किंवा ९ नंतर ठेवण्यात यावी. याकरिता महापालिका शिक्षण विभागाकडून सर्व खासगी शाळेच्या मुख्याध्यपकांना पत्र दिलेले आहे. तरीही खासगी शाळा व्यवस्थापनाकडून शासन आदेशासह महापालिकेच्या शिक्षण विभागाला केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे खासगी शाळा व्यवस्थापनाच्या आडमुठेपणाचा पालकांना मात्र नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या शाळांवर आता शिक्षण विभागाकडून कोणती कारवाई होणार याकडे सर्व पालकांचे लक्ष लागले आहे.

# पोलीस दलातील लाडक्या 'लिओ'चा मृत्यू

## पोलिसांच्या शूर शिपायाला भावपूर्ण निरोप : पोलीस दल झाले भावूक

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेत गेल्या आठ वर्षांपासून कार्यरत असलेला लाडका श्वान 'लिओ'चा आजारपणाने मृत्यू झाला आहे. लिओने मेफेड्रोनसह अमली पदार्थांचा साठा पकडून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. शोकाकुल वातावरणात सलामी गार्डने लिओला अखेरची मानवंदना दिली.



लॅब्रोडोर जातीच्या लिओचा जन्म जुलै २०१६ मध्ये झाला. तो चार महिन्यांचा असताना, सप्टेंबर २०१६ मध्ये, पुणे पोलीस दलातील श्वानपथकात त्याचा समावेश करण्यात आला. त्यानंतर त्याला प्रशिक्षकाकडून (हँडलर) खडतर प्रशिक्षण देण्यात आले. श्वान प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेताना त्याला अमली पदार्थ हुडकणे, तसेच कवायतीचे प्रशिक्षण देण्यात आले होते. श्वान प्रशिक्षण केंद्रातील खडतर प्रशिक्षण पूर्ण करण्यात आल्यानंतर त्याचा समावेश गुन्हे शाखेतील अमली पदार्थविरोधी पथकात करण्यात आला होता.

गेल्या आठ वर्षांपासून लिओ गुन्हे शाखेत कार्यरत होता. सोलापूर रस्त्यावरील लोणी काळभोरमधील एका शेतात गांजाची लागवड करण्यात आली होती. या शेतातून ७० किलो गांजा जप्त करण्यात आला होता. या कारवाईत लिओ सहभागी झाला होता. त्याने एका नायजेरियन तस्कराकडून गांजा, तसेच मेफेड्रोनचा साठा पकडून दिला होता. २०१९ मध्ये कोंढवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका नायजेरियन नागरिकाकडून अमली पदार्थ आणि ५० किलो गांजा जप्त करण्यात लिओची महत्त्वाची भूमिका होती.

लिओचा नियमित तपासणीत सहभाग पुणे रेल्वे स्थानक, तसेच बसस्थानक, येरवडा कारागृहात नियमितपणे अमली पदार्थांची तपासणी करण्यासाठी लिओला नेण्यात यायचे. अन्य श्वानाच्या तुलनेत लिओची घ्राणेंद्रिय तीक्ष्ण असल्याने त्याचा फायदा पोलिसांना झाला होता. विविध शाळा, तसेच लष्कराच्या कार्यक्रमात लिओ सहभागी व्हायचा.